मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# छत्रपती संभाजी राजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी एकत्र

## राज्यात विधानसभेसाठी तिसऱ्या आघाडीची शक्यता?





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी (वृत्तसंस्था)**

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिसऱ्या आघाडीची चाचपणी सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी एकत्र येत तिसरी आघाडी निर्माण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या अनुषंगाने बच्चू कडू, छत्रपती संभाजीराजे आणि राजू शेट्टी यांनी ओला दुष्काळ पाहणी दौरा सुरू केला आहे.

परभणी येथील ओला दुष्काळाची पाहणी बच्चू कडू, छत्रपती संभाजीराजे आणि राजू शेट्टी यांनी केली. परभणी येथील मानवत तालुक्यातील रामेटाकळी येथील शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधत त्यांच्या झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी या तिघांनी एकत्रित केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर या तिघांनी एकत्रित येत येथील समस्या तसेच परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी हा दौरा सुरू केला आहे.

शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर बच्चू कडू यांनी सरकारने त्वरित शेतकऱ्यांची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे. उद्योगांप्रमाणे शेतीलाही विमा हवा, असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले. अशा प्रकारची अतिवृष्टी होणे हे नेहमी होते आणि नेहमीच शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होतात. म्हणून आम्ही सरकारला कायमचा उपाय सांगत आहोत की, पेरणी पासून ते कापनीपर्यंत सगळा खर्च योजनेमध्ये बसवला पाहिजे. मजूरीचा खर्च जर योजनेमध्ये बसला तर गावात मजूर पण स्थिर होईल आणि शेतकरी पण स्थिर होईल. यामुळे नुकसान पण कमी होईल, असे बच्चू कडू यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, आता आपण बघतो की शेतकऱ्यांचे नुकसान झाले की त्याचे पंचनामे होतात आणि तीन महिन्यानंतर त्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळतात. असे न करता नुकसान भरपाई लगेच मिळाली तर बरे होईल. जसे उद्योगांना विमा असतो, तसा शेतीला तुम्ही का देत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू असल्याचे दिसत आहे. त्यात आता तिसऱ्या आघाडीची चर्चा सुरू असून बच्चू कडू, छत्रपती संभाजी राजे आणि राजू शेट्टी यांच्या या एकत्रित दौऱ्यामुळे ही तिसरी आघाडी तयार झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. त्यामुळे आता आगामी निवडणुकीत काय चित्र बघायला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कवळे गुरूजी यांनी तहसीलदार यांच्याकडे केली

# उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

उमरी तालुक्यांमध्ये सतत झालेल्या पावसामुळे सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर आदी पिकांच्या झालेल्या नुकसान भरपाई पोटी सरसकट आर्थीक मदत देण्याबाबत चे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

उमरी तालुक्यांमध्ये १ सप्टेंबर ते ०५ सप्टेबर पर्यंत झालेल्या सतत च्या पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापुस, मुग, उडीद, तुर व आदी पिके उध्वस्त झाली. तरी आपण ५ हजार २९ हेक्टर क्षेत्र बाधीत ग्रहीत धरले आहे तसे न करता १०० टक्के ३१ हजार हेक्टर क्षेत्र पुर्ण पणे बाधीत झालेले आहे. सततच्या पावसामुळे शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई देणे ग्राहय आहे. या वर्षामध्ये निसर्गाच्या अवक्रपेने शेतकरी महासंकटात सापडला आहे. तसेच निसर्गाच्या अवक्रपेमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट १०० टक्के खरीप पिक विमा मंजुर करण्यासाठी पिक विमा कंपनीला आदेशीत करावे, व उमरी तालुक्यातील शेतक-यांना शासन निर्णया प्रमाणे तात्काळ नुकसान भरपाई देण्याचे पत्र आज तहसिलदार यांना मारोतराव कवळे गुरूजी यांनी देऊन मागणी केली आहे .

### जिल्ह्यामध्ये ४०० पेक्षा जास्त तांड्याना महसुलदर्जा

# २०० पेक्षा जास्त तांडयाना ग्राम पंचायतचा दर्जा मिळणार-राठोड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



महाराष्ट्र मध्ये गेली ७५ वर्षात बंजारा लमान समाजाचा विकास झालेला नाही.अनेक तांडे प्राथमिक मूलभूत सुविधा पासून दूर आहेत. त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना असणे आवश्यक होते. श्री संत सेवालाल महाराज बंजारा-लमाण तांडा समृद्धी योजना राज्य शासनाने कार्यान्वित केलेली आहे. त्यामुळे बंजारा समाज विकासाच्या मूळ प्रवाहात येणार असून येत्या काळात जिल्ह्यामध्ये ४०० पेक्षा जास्त तांड्यांना महसूल दर्जा व २०० पेक्षा जास्त तांड्यांना ग्रामपंचायत दर्जा मिळणार असल्याचे 'संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी'योजनेचे अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी सांगितले.

कंधार येथील बीजेपी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी हितगुज करताना ते बोलत होते. बंजारा लमाण-तांड्यांना स्वतंत्र महसुली गावाचा दर्जा देणे व तांड्यांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करून बंजारा समाजाला राजकीय प्रवाहात आणणे गरजेचे होते. यासाठी पुनर्वसित गावांच्या धरतीवर महसुली गावांचा दर्जा देऊन ग्रामपंचायत स्थापन करुन पाणी,वीज, शाळा अंगणवाडी, आरोग्य पदथदिवे, गटारे अंतर्गत रस्ते इत्यादी सोयी सुविधा निर्माण करणे गरजेचे होते.

महाराष्ट्र राज्यात बंजारा लमाण समाजाचे अनेक तांडे असून अशा तांड्यामध्ये बंजारा समाज अनेक वर्षांपासून राहत असला तरी बंजारा लमाण समाजाच्या प्राथमिक, मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यासाठी तांड्याच्या विकासात स्वतंत्र योजना असणे आवश्यक आहे.

ही बाब लक्षात घेऊन बंजारा लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे व सामूहिक विकासाच्या विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा लमाणतांडा समृद्धी योजना सुरू करण्यात करण्याची आली असल्याचे त्यांनी सांगितले.

बंजारा लमातांड्याच्या विकासासाठी संत सेवालाल महाराज बंजारा लमाणतांडा स्मृती योजनेअंतर्गत सर्व आवश्यक मूलभूत सुविधा या शासनाच्या प्रचलित मूलभूत सुविधा पुरविण्याच्या धोरणानुसार उपलब्ध करून देण्यात याव्यात असे यावेळी सांगितले. महाराष्ट्रात बंजारा समाजाची लोकसंख्या असलेल्या वस्तीत ताड्यांचा टोच नकाशा तयार करण्याचे काम युद्ध पातळीवर चालू आहे.तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९९६६ चे कलम ४ अनुसार महसुली गावांचा दर्जा देण्यासाठी भूमापक क्रमांकाची माहिती तलाठी यांच्याकडून घेण्यात चालू असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.यावेळी भाजप तालुकाध्यक्ष प्राचार्य किशनराव डफडे,तालुका सरचिटणीस मधुकर पाटील डांगे,सतीश कांबळे उपस्थित होते.

# व्यंकटेश नगर व इस्लामपूर भागात स्मशान भूमी साठी जागा उपलब्ध करून द्या

### मुख्यधिकारी निलम काबंळे याच्याकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । साहेबराव दुगाने**





उमरी शहरातील व्यंकटेशनगर व इस्लामपूरा भागात वाढती लोकसंख्या प्रमाणे स्मशानभुमीची अंत्यत अवश्यक आहे. या नगरात गणेश नगर,आंबेडकर नगर,आनंदीबाई नगर,इस्लामपूरा नगर ,आधी असून हा भाग रेल्वे पटरीच्या पलीकडे स्मशानभूमीला जाण्यासाठी रेल्वेमार्गावरून रेल्वेगेट पटल्याने अंतिविधी करण्यासाठी प्रेताची अवहेलना होत असल्याने त्याच भागात उमरी-सावरगाव रोड वरील दत्तमंदिर शेजारील किंवा हुतात्मा स्मारक शेजारी असलेल्या शासकीय जागेवर स्मशानभुमीची जागा उपलब्ध करून द्यावे अशी मागणी जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण समिती व सामाजिक कार्यक्रत्य सोनू वाघमारे यांनी उमरी नगर परिषदेचे मुख्यधिकारी निलम काबंळे यांना निवेदनद्रवारे मागणी केली आहे. यावेळी निवेदन देतांना पाडुरंग सोनकाबंळे, प्रल्हाद हिवराळे,फिरोज पटेल,राजेश सवई आधी होतो.

# खा.राऊत यांच्या शिवसंवाद मेळाव्याला मोठ्या संख्येने वाजत गाजत या-संजय पा.ढाले व संतोष पा.कापसीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**







कंधार लोहा विधानसभा मतदारसंघ शिवसंवाद मेळावा गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी वेळ सकाळी १० वाजता स्थळ राधाई मंगल कार्यालय मेन रोड लोहा येथे फिक्स आमदार एकनाथ दादा पवार यांनी आयोजन केले असून शिवसेनेच्या विधानसभा निवडणूक मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन माननीय खासदार संजय राऊत यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे याचाच अर्थ एकनाथ दादा पवार हे फिक्स उमेदवार आहेत फिक्स आमदार आहेत असे विधान शिवसेनेच्या पक्षप्रमुखांनी तसेच वरिष्ठ नेत्यांनी स्पष्टीकरणासहित अनेक वेळा आपल्यासमोर सांगितलेले आहेच पुन्हा आपल्या लोहा शहरात तुम्ही येऊन खा.संजय राऊत यांच्या तोंडून उमेदवारी बदल ऐकण्यासाठी लोहा येथे वाजत गाजत येण्याचे आवाहन लोहा तालुका शिवसेना तालुकाप्रमुख संजय पाटील ढाले व लोहा तालुका शिवसेना उपतालुकाप्रमुख संतोष पाटील कापसीकर यांनी शिवसैनिकांना व जनता जनार्दन यांना केले आहे.हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असेही त्यांनी सांगितले आहे.



**झाडे लावा झाडे जगवा**

## चारोळी

**गौराईच्या पाऊलांनी**
**लक्ष्मी घरा येईल**
**सुखसमृद्धी आरोग्य**
**भरभरून देईल.**

**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

# अकोलेत निळवंड धरणावरून शरद पवार गटाचे चाकबंद आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अकोले (वृत्तसंस्था)**

आकोले येथील निळवंड धरणाच्या निकृष्ट कालव्यांच्या कामाविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाने चाकबंद आंदोलन केले. यावेळी माजजी जिल्हा परिषद सदस्या सुनीता भांगरे यांच्या नेतृत्वात महिलांनी आक्रमक भूमिका घेत हातात दगड घेऊन कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला. आवर्तन बंद केले नाही तर पाण्यात उड्या मारण्याचा इशाराही यावेळी आंदोलकांनी दिला आहे.शरद पवार गटाचे आंदोलक निळवंड धरणाच्या चाकापर्यंत पोहोचले होते.

# नांदेड वाघाळा महापालिकेवर पुरग्रस्त नागरिकांचा आक्रोश मोर्चा धडकला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



मागील झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड शहरातील अनेक भागातील नागरिकांचे पुरामुळे अतोनात नुकसान झाले असून त्यांच्या वर उपासमारीची वेळ आली आहे.घरातील सर्व सामान भिजून गेले आहे.पाऊस बंद झाला असला तरीही गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे आणि शहरातील पावसाच्या पाण्याने सखल भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून लवकरात नांदेड वाघाळा महापालिकेने नागरिकांना दिलासा देऊन नुकसान भरपाई देण्याची मागणी मोर्चेकऱ्यांनी केली आहे.नांदेड शहरातील वजिराबाद,जूना मोंढा, इतवारा,चौफाळा येथील नागरिकांनी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते.लवकरात लवकर मदत नाही मिळाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा वजिराबाद,जूना मोंढा, इतवारा,चौफाळा येथील नागरिकांनी महापालिकेला इशारा दिला आहे.

# आष्टीत पीएम कुसुम सौर ऊर्जा पंप योजनेमध्ये सब एजंटांनी केला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा..?

## बंदुकीचा धाक दाखवून मंजूर पंप रोख स्वरूपात दुसर्याला विकले ?

## माजी राज्यमंत्री सुरेश धस यांची चौकशीची मागणी;आष्टी पोलिसात तक्रार दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी I अण्णासाहेब साबळे**

पीएम कुसुम सौर योजना हा भारत सरकारचा उपक्रम असून शेतकऱ्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीला चालना देऊन त्यांच्या जमिनीवर सौर पंप आणि सौर ऊर्जा संयंत्र बसवून वारंवार होणारी वीज कपात वीज टंचाई आणि लोड शेडिंग ची समस्या यावर उपाययोजना म्हणून केंद्र शासनाने पीएम कुसुम सौर ऊर्जा योजना कार्यान्वित केली आहे..

मात्र या कंपन्यांनी नेमलेले सब एजंट आणि त्यांचे सहाय्यक यांनी या योजनेमध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला असून काही लाभार्थ्यांच्या नावे मंजूर झालेले पंप रोख पैसे घेऊन दुसऱ्या शेतकऱ्यांना विकले आहेत विरोध करणाऱ्या लाभार्थ्यांना काही सब एजंटांच्या सहकाऱ्यांनी बंदुकीचा धाक दाखवल्याच्या देखील घटना घडलेल्या आहेत.. या सर्व प्रकरणाची आणि आर्थिक घोटाळ्यातील सहभागी असणारे यांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत.. अशी मागणी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी आज पोलीस स्टेशन आष्टी येथे जाऊन केली आहे..

या योजनेचे लाभार्थी राजेंद्र गोंदकर यांनी या प्रकरणी आष्टी पोलीस स्टेशन येथे रीतसर फिर्याद दाखल केली आहे.. याविषयीचे सविस्तर वृत्त असे की,शेती सिंचनासाठी पाण्याची नितांत गरज असून जगभरात एकूण लागवडीखालील जमिनीच्या २०% शेती सिंचन पद्धतीने केली जाते असून या संचित शेती तून जगभरात उत्पादित एकूण अन्नधान्यांमध्ये ४०% योगदान या सिंचित शेतीतून होत आहे..

केवळ पावसावर आधारित शेती आणि सिंचित शेती याची तुलना केल्यास सिंचित शेतीतून दुप्पट उत्पादन मिळू शकते तसेच शेतीची उत्पादन क्षमता वाढून पिकात वैविधता येते महाराष्ट्रात कृषी क्षेत्रापैकी ८० टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे आणि जवळपास ७० टक्के शेतकरी अत्यल्प अल्पभूधारक वर्गात मोडतात त्यांच्यासाठी विजेवर चालणारे पंप आणि डिझेल पंप याचा वापर होतो..

परंतु महाराष्ट्रातील बहुतांशी शेती दुर्गम मागास भागात असल्यामुळे विजेद्वारे चालणारे पंप वापरण्यास अडचण निर्माण होतात तसेच वारंवार होणारी वीज कपात, वीज टंचाई, लोड शेडिंग मुळे शेतकरी हैराण असल्यामुळे केंद्र शासनाने शासनाने पीएम कुसुम सौर ऊर्जा योजना ही योजना सुरू केली असून त्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून नोंदणी करता येते लाभार्थी शेतकऱ्यास मंजुरीनंतर त्याच्या वाट्याची रक्कम भरावी लागते उर्वरित रक्कम केंद्र शासन कंपनीकडे भरत असते या ऑनलाइन पद्धतीमध्ये काम करणारे काही कंत्राटी कर्मचारी आणि काही वीज कर्मचारी यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये मंजूर झालेले पंप दुसरे शेतकऱ्यांना रोख पैसे घेऊन विकण्याचे प्रकार घडलेले आहेत काही शेतकऱ्यांनी याबाबत विरोध केला असता कंपन्यांचे नेमलेले सगळे त्यांचे सहकारी यांनी लाभार्थी शेतकऱ्याला बंदुकीचा धाक दाखवून मंजूर पंप दुसऱ्या शेतकऱ्यांना रोख पैसे घेऊन विकल्याच्या घटना घडलेल्या आहेत पीएम कुसुम सौर घटक ब चे लाभार्थी असलेले तालुक्यातील केरूळ या गावचे शेतकरी राजेंद्र गोंदकर यांनी पोलीस स्टेशन मध्ये या गैरप्रकार बद्दल फिर्याद दाखल केली आहे आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये असे गैरप्रकार घडलेले आहेत कुसुम सौर योजनेचे महाराष्ट्र राज्यात काम करणाऱ्या ९ ते १० कंपन्या असून सर्व कंपन्यांनी



खाली नेमलेले एजंट यांनी हा महा घोटाळा केल्याचे दिसून येत असून त्यांना काही वीज वितरण कंपनीचे कर्मचारी देखील सामील झाल्याचे बोलले जात आहे या सर्व प्रकाराची चौकशी करून गुन्हे दाखल करावेत अशी मागणी ही शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळा समवेत माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केली आहे

शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना कृषि वापरासाठी कुसुम घटक ब योजना उपलब्ध करुन देण्यात आली.मात्र या योजनेच्या मूळ लाभार्थ्यांना याचा लाभ न होता यामध्ये संबंधित कंपनीचे डिस्ट्रीब्यूटर याने संगनमताने चिरीमिरी घेऊन इतरांना ते सोलर पंप देण्याचा सपाटा लावला असल्याने आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याने या मागे असलेल्या मुख्य सुत्रधारावर कायदेशीर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची मागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी केली आहे.

शेतकऱ्यांमध्ये सौर ऊर्जा निर्मितीला चालना देणे.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीवर सौर पंप आणि सौर ऊर्जा संयंत्रे लावण्यासाठी प्रोत्साहन ज्यामुळे त्यांचे पारंपारिक उर्जा स्त्रोतांवरील अवलंबित्व कमी होऊन शाश्वत कृषी पद्धतींना हातभार लावण्यासाठी पीएम-कुसुम योजना शेतकऱ्यांना लागू करण्यात आली.या योजनेअंतर्गत ३, ५ व ७.५ एच.पी क्षमतेचे सौर कृषिपंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर उपलब्ध केले गेले.सौर कृषिपंपांसाठी पात्र लाभार्थ्यांना पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतक-यास १० टक्के आणि अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यास ५ टक्के लाभार्थी हिस्सा भारण्यासाठीचा असतो.या योजनेचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर संबंधित विभागामार्फत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना मेसेजच्या माध्यमातून कळविण्यात येते. त्यानंतर संबंधित लाभार्थी शेतकरी कोणत्या कंपनीचा सोलर घ्यायचा याची निवड करून संबंधित विभागाला कळवतो. तदनंतर सदर कंपनीचा डिस्ट्रीब्यूटर आणि महावितरणच्या वायरमनला पुढील ६० दिवसाच्या आत सौर पंप बसवणे अनिवार्य असते. मात्र यामध्ये आष्टी तालुक्यात मोठे गौडबंगाल उघडकीस आले असून यामध्ये संबंधित डिस्ट्रीब्यूटर आपल्या स्तरावरून लाभार्थ्यांपर्यंत हा सौर पंप न जाऊ देता याची परस्पर इतरांना विक्री करण्याचा प्रकार उघडकीस आला असून याबाबत अनेक शेतकऱ्यांनी सदरील कंपनी डिस्ट्रीब्यूटर यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया हातात घेतली असून यामध्ये आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप करत माजी मंत्री धस यांनी शेतकऱ्यांसह आष्टी पोलीस ठाणे तसेच महावितरण कार्यालयात धाव घेत याबाबत सखोल माहिती घेत संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**पीएम कुसुम सौर योजनेचे लाभार्थी यांना ऑनलाइन पद्धतीने मंजुरीचे मिळालेले पत्र आणि त्यांच्या मंजुरीचे सौर यंत्र दुसऱ्या शेतकऱ्याकडे बसवले असल्याबाबतचा प्राथमिक पुराव्या बाबतचे कागदपत्र मागवले आहेत तपासणी नंतर लगेचच गुन्हा दाखल करण्यात येईल**


**-सोमनाथ जाधव,पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन आष्टी**

## थकीत ठिबक-तुषार अनुदान व इतर मागण्यासाठी

# शेतकऱ्यांचा मोर्चा बैलगाडी ट्रॅक्टर सहित तहसिल ला धडकला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा I ज्ञानेश्वर बुधवत**



ठिबक व तुषार सिंचन संचाचे सण २०२३-२४ मधील प्रलंबित अनुदान तात्काळ मिळावे आणि प्रलंबित रिजेक्ट केलेल्या शेतकऱ्याचा विमा ऍक्टिव्ह करून तात्काळ देण्यात यावे तसेच सन २०२४ करिता शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार साठी केलेल्या अर्जाची लॉटरी निवड करून व पूर्वसंमती देऊन अनुदान मिळण्यासाठी कारवाई करणे साठी शेतकरी मित्र दिलीप चौधरी व शेतकरी योद्धा बालाजी संतोष सोसे व महाविकास आघाडी यांनी आज सिंदखेड राजा तहसिलदार यांच्या तहसील कार्यालया वर आज बैलगाडी आणि ट्रॅक्टर मोर्चा काढला होता २९/०८/२०२४ ला वरील संदर्भात तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले होते परंतु सदर निवेदना बाबत कोणतीही कारवाई झालेली नाही त्यामुळे आज दिनांक ९/०९/२०२४ ला बैलगाडी ट्रॅक्टर मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे असे निवेदनात म्हटले आहे, ठिबक व तुषार सिंचनाची वापर करून पाणी, खत, वीज मजूर, बचत करून शेतमालाचे अधिक व दर्जेदार उत्पादन यावेत म्हणून शेतकरी सूक्ष्म सिंचनाच्या अवलंब करीत असतो केंद्र व राज्य सरकार द्वारे राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत शेतकऱ्यांनी २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्जाचे पैसे काढून काही शेतकऱ्यांनी स्वतःची गुंतवणूक करून अनुदान मिळते म्हणून ठिबक व तुषार संच खरेदी केलेले आहेत परंतु शासनाने पूर्वसंमती देऊनही आजपर्यंत शेतकऱ्याला गेल्या दीड ते दोन वर्षापासून अनुदान दिलेली नाही, तरी या थकीत शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे, तसेच काही शेतकऱ्यांनी सन २०२४-२५ मध्ये नवीन अर्ज केलेले आहेत या आर्थिक वर्षामध्ये ठिबक व तुषार सिंचन साठी लॉटरी होऊन निवड झालेली नाही ही योजना ठप्प आहे तरी पूर्वसंमतीची प्रतिक्रिया पूर्ण करून द्यावी जेणेकरून संच घेऊन पिकास योग्य पाणी व खत देण्यास शेतकरी यांना नियोजन करता येईल. त्याच प्रमाणे रिजेक्ट केलेल्या शेतकऱ्यांचे पिक विमा अर्ज रिॲक्टिव्ह करावे, व रद्द केलेले पिक विमा अर्जाचा सरसकट पिक विमा शेतकऱ्यांना मिळावा. जर वरील प्रमाणे पंधरा दिवसात शेतकऱ्यांचे ठिबक / तुषारचे थकीत अनुदान व रद्द झालेले शेतकऱ्यांचे पीक विमा रक्कम मिळाली नाही तर मी शेतकरी मित्र दिलीप चौधरी दिनांक ३०/०९/२०२४ शासनाच्या विरोधात आत्मदानाचा इशारा देत आहे तरी शासनाने याची दखल घेऊन त्वरित शेतकऱ्यांची अनुदान व विम्याची रक्कम अदा करावी.असे तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.



आंतरराष्ट्रीय कथावाचक, भागवत भूषण परमपूज्य पंडित श्री.प्रदीप मिश्रा जी ( सिहोरवाले ) यांची जिल्हा नांदेड येथे कथा साकार केल्या बद्दल प्रशांत सावकार पातेवार,व शुभम सावकार पातेवार आज लोहा येथे सत्कार करताना लोहा कॉंग्रेसअल्पसंख्याकतालुका अध्यक्ष व नगरसेवक सभापती न पा लोह,शरफोदिन शेख व पंढरी पाटील चिचोरे, रवि सेठ मिसे, राजेश भाऊ सुवर्णकार, दत्ताभाऊ निलेवाड, दशरथ गुंठे, व मित्र परिवार लोहा शुभेच्छादेताना.छाया(लोकनेता न्युज नेटवर्क लोहा)

## पूजा अर्चना साधना आराधना तपस्या करणाऱ्या

# सौभाग्यवती विजयाबाई सतीश संचेती झाल्यात अनंतात विलीन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार I विनायक कुटे**

लोणार जैन श्वेतांबर मूर्ती पूजक श्री संघ च्या चातुर्मास मध्ये आलेल्या महासती प.पु. प्रिय स्मिता श्रीजी महाराज साहेब, मधुर व्याख्याने डॉ. प्रियलता जी महाराज प.पु प्रिय दर्शना जी महाराज साहेब त्यांच्या मार्गदर्शनाखाली पर्युषण पर्व पार पडले. यात शनिवारी ७-८-२०२४ च्या समाप्तीच्या दिवशी मारा साहेब यांनी बारसासूत्र ग्रंथाचे वाचन केले या ग्रंथ वाचनानंतर मारा साहेब यांच्या वाणीतून खमत खामना बाबत त्यांनी त्यांचे विचार मांडून क्षमायाचना करताच श्री संघाने त्वरित मारा साहेब यांना सुद्धा क्षमायाचना केली व नंतर पूर्ण समाज बांधवांची लहान मोठ्या यांची सर्वांनी एकमेकाची क्षमायाचना केली. सदर कार्यक्रमात भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला या दिवशी सोबत सवंतसरी प्रतिक्रमण संध्याला असल्याने मोठ्या संख्येत भाविक उपस्थित झाले होते त्यामध्ये पुरुष व महिलांची तसेच मुला-मुलींची संख्या भरमसाठ होती. ह्या संवतसरी दिवशी सकाळी सकाळी ५ ला घेतलेल्या पोसा मध्ये धार्मिक माता सौभाग्यवती विजयाबाई सतीश संचिती यांनी सकाळपासूनच साधना आराधना मध्ये मग्न झालेल्या विजयाबाईने सर्वांच्या समक्ष प्रतिक्रमण करण्यासाठी आपले आसन ग्रहण केल्यानंतर बरेच तास सवंतसरी प्रतिक्रमण हे पूर्ण विधी स्तोत्रासह करत असताना अचानक त्यांच्या तब्येतीमध्ये अस्थिरता आल्याने प्रतिक्रमण मध्ये असलेल्या डॉक्टर महोदयांनी त्यांना बघण्याचे प्रयत्न केले असता सौ विजयाबाईने डॉक्टर महोदयांना सांगितले मी पोसा घेतला आहे मला तपासण्याची गरज नाही अशा प्रकारे नकार दिल्यानंतर काही क्षणालाच साधना आराधनामध्ये असलेल्या सौ विजयाबाई संचेती यांनी देवाचे नाव घेऊन आपली जीवन यात्रा सर्वांच्या समक्ष गुरुमारासाहेब यांच्यासमोर संपवीली ते अनंतात विलीन झाल्यात त्यानंतर आज दी. ८-९-२०२४ ला त्यांची डोली यात्रा घरासमोर ठेवल्यानंतर त्यांच्या दर्शनासाठी भाविक भक्तांची गर्दी होती त्यानंतर दुपारी तीन वाजता डोली त्यांच्या सराफा बाजारा मधील घरापासून डुगरवाल चौक, जैन मंदिर, धीरज गेलडा भवन, प्रताप चौक, आर्यभवन ,स्वतंत्र मैदान मार्ग अमरधाम येथे नेण्यात आली या डोली यात्रा मध्ये जैन बांधव आया बहिणी बाहेर गावातील जैन बांधवांचा लोणार सह तालुक्यातील सर्व स्तरावरील नागरिक बांधवांनी आया बहिणी या डोली मध्ये सहभागी झाल्या होत्या आणि अनेकांच्या मुखातून शब्द निघत होती असेच हे मरण लाखो मधून एखाद्यालाच येत असते जैन मंदिर आणि स्थानकच्या बाहेर पटांगणात दोन्ही ठिकाणी मारा साहेब यांनी मंगली दिली अमरधाम मध्ये अग्नी दिल्यानंतर काही मान्यवरांनी श्रद्धांजली दिली.



# श्रद्धा,विश्वास ठेवला तर कुठल्याही क्षेत्रात यश मिळते-आ.रायमुलकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

संत गजानन महाराज हे मराठी जणांचे श्रद्धास्थान असून श्रद्धा ,विश्वास असेल तर कुठल्याही क्षेत्रात निश्चित यश मिळते ,असे विचार आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केले . ऋषिपंचमीनिमित्त लोणार येथील गजानन महाराज मंदिरात आयोजित महापूजेच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आमदार रायमुलकर बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. संस्थानचे अध्यक्ष रामदास मापारी, इंगळे काका , शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीभाऊ मापारी, भगवानराव कोकाटे ,नंदूभाऊ मापारी, गटशिक्षणाधिकारी जंगल सिंग राठोड, संतोष भाऊ मापारी अशोक वारे, डॉ.काशिनाथ घुगे ,शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, समाधान साबळे ,विजय मापारी, जी. डी. राठोड, डॉ. अनिल मापारी प्रामुख्याने उपस्थित होते.

रामदास मापारी , इंगळे काका यांच्या हस्ते मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. आपला भाषणात संजय रायमुलकर पुढे म्हणाले की, संस्थांसाठी रस्ता व सभामंडप असे ५५ लाख रुपयांचे काम मंजूर करण्यात आले आहे. संत गजानन महाराजांवर माझे अपार श्रद्धा आहे. भाविकांनी मागणी केल्याप्रमाणे शारा,वडगाव तेजन, मातरखेड येथे गजानन महाराज मंदिर सभागृह व संरक्षक भिंत कामासाठी व मेहकर येथे गजानन महाराज मंदिरासाठी संरक्षण भिंत ,सभागृह यासाठी मोठा निधी देण्यात आला आहे.लोणार येथील लेंडी तलाव सौंदर्यीकरण करण्यासाठी १७ कोटींचा निधी मंजूर करून दिला आहे. हा परिसर अतिशय रमणीय असा होणार आहे. जिल्ह्यात सर्वाधिक निधी मेहकर लोणार तालुक्यात खर्च झाला आहे. मतदार संघ हाच परिवार समजून त्यातील घटकांची सेवा करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या वैष्णवी संतोष आडे, साक्षी संजय चव्हाण, अपूर्वा राजेश नागरे ,पल्लवी दिनकर दराडे, अभिषेक दिनेश ढवळे ,साक्षी उद्धव अंभोरे यांचा सहकुटुंब सत्कार आमदार रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आला. भारतीय सैन्य दलात सबलेफ्टनंट पदावर निवड झाल्याबद्दल आनंद नितीन हुंबाड याचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नितीन हुंबाड यांनी केले तर दीपक चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.



## तीस वर्षापासून कुकडीचे पाणी आणतो म्हणून

# भुलथापा देणाऱ्या महायुतीच्या उमेदवाराला जाब विचारण्यासाठी संवाद यात्रा-प्रा.सुशीलाताई मोराळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





१९८० पासून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघ हा भीमराव धोंडे,सुरेश धस, आजबे यांच्याकडे आलटून पालटून या मतदारसंघाचे नेतृत्व आहे ४४ वर्ष यांनी सत्ता भोगली परंतु नजरेत भरणारे एकही काम ते करू शकले नाहीत.आता या तिघांनाही आरामाची गरज आहे नव्या उमेदीने महाविकास आघाडीकडे या मतदारसंघाचे नेतृत्व सोपवावे असे आव्हान राष्ट्रवादीच्या प्रवक्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी मतदार संवाद यात्रेदरम्यान लोणी (सय्यदमीर),कोयाळ,पिंपळगाव, नांदूर (विठ्ठलाचे),दादेगाव (रामाचे), पुंडी,पिंपरखेड, डोंगरगण,महादेव वाडी, कुंभारवाडी,कनेरवाडी इत्यादी ठिकाणी मतदारांना विनंती केली आहे.शरदचंद्र पवार यांचे नेतृत्वात महाविकास आघाडीतील ठाकरे सेना काँग्रेस माकप भाकप शेकाप सपा सह अन्य घटक पक्ष काम करीत आहेत.आपण पवार साहेबांना पक्षाची उमेदवारी मागितली आहे तत्पूर्वी मतदार संघात मतदारांशी थेट संवाद करण्यासाठी ही यात्रा काढली आहे.निवडणुकीत फक्त मते मिळवणे इतकाच उद्देश न ठेवता लोकशिक्षणही केले पाहिजे म्हणून प्रयत्न आम्ही करीत आहोत. बीड जिल्हा आणि त्यात आष्टी - पाटोदा- शिरूर हा कायम दुष्काळी मतदारसंघ आहे. मतदारसंघातील नद्या ह्या दक्षिण वाहिनी आहेत.सीना नदी ही कृष्णा नदीची उपनदी आहे. विंचरणा मांजरा मेहेकरीसह अन्य नदीचे पाणी कृष्णेला मिळते म्हणून कृष्णा खोऱ्याचे जवळपास २५ टीएमसी पाणी मराठवाड्यातील बीड उस्मानाबाद आताचा धाराशिव ला मिळाले पाहिजे यासाठी गेली ४० वर्ष आम्ही जनता विकास परिषदेचे नेते गोविंद भाई सराफ यांच्या नेतृत्वात काम केले आहे. कॉम्रेड गंगाधर आप्पा बुरांडे कॉम्रेड अत्तर बाबर,कॉम्रेड भाऊसाहेब गीते,कॉम्रेड नानासाहेब पोकळे,कॉम्रेड तुकाराम पवार,कॉम्रेड पेंटर एकबाल,राजाभाऊ देशमुख, कॉं.नाईकनवरे अशा शेकडो नेत्यांनी कृष्णा खोऱ्याचे पाणी आष्टी पाटोदा शिरूरला मिळावे म्हणून प्रयत्न केले आहेत. त्यासाठी रस्त्यावर येऊन मोर्चे धरणे आंदोलने केली आहेत मात्र विधानसभेत व विधान परिषदेत लोकप्रतिनिधी आपला आवाज उठवला नाही कुकडीच्या पाण्याची वाट बघत बघत म्हातारे झाले काही जण मृत्यू पावले.तसेच याप्रसंगी या दौऱ्यात त मुरली बांगर,विक्रम कोरडे,लक्ष्मण मस्के,अर्जुन सानप,संतोष जाधव,माऊली शिरसाट,माणिक गायकवाड मुगगावचे थोरात सह मान्यवर हजर होते.

# वाखरड शिवारातील मन्याड नदीत अडकलेल्या वानरांचे जीव वाचवण्याचे प्रशासनाचे आश्वासन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील वाखरड येथील अतिवृष्टी झालेल्या पावसामुळे मन्याड धरणामध्ये महापूर येऊन मन्याड धरण १०० टक्के भरले आहे.

वाखरड शिवारातील जुन्या वाखरड गावा जवळील झाडावर वानरांचा कळप अडकला असून ते लहान लहान पिल्ले घेऊन मुके जिव त्या झाडावर अडकून पडले आहेत,त्या झाडाभोवती मन्याड धरणातील पाणीच-पाणी आहे,असे आम्हाला त्या गावांतील भोई समाज निषाद पार्टीचे कार्यकर्ते तिरुपती मेकलवाड व त्यांचे सहकार्यानी संपर्क करून तेथील हकीगत सांगितली तेव्हा लागलीच भोई समाज नांदेड जिल्हा अध्यक्ष निषाद पार्टिं डूबूकवाड तसेच वाखरड-वाखरडवाडीचे सरपंच ज्ञानेश्वर रघुनाथ मुंडे,सौ.विनीता राजू गिते उपसरपंच,वसंतराव निलेवाड,व्यंकटराव नागलवाड यांनी कंधार तहसील मध्ये जाऊन नायब तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकारी सौ.संगेवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी लागलीच एनडीआरएफ,वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून येत्या २४ तासांमध्ये मन्याड धरणातील झाडावरील वानरांना मुक्या जीवांना वाचवून घेऊ असे आश्वासन प्रशासनाने दिले,तेव्हा सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले.

# पुणे जिल्हा खनिकर्म शाखेचा कारभार आंधळ दळतय आणि कुत्र पिठ खातय

## जिल्हाधिकारी कार्यालयातील खनिकर्म शाखेचे सुयश जगताप सतत नॉट रिचेबल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



पुणे जिल्ह्यातील खानिकर्म शाखेचा अंदा-धुंद कारभार वासुंदे ता.दौंड येथे पाहायला मिळत असून, येथील महसूल चे जिल्हा खनिकर्म अधिकारी सुयश जगताप हे नॉट रिचेबल असतात.ते सर्वसामांन्य नागरिकांचा फोन तर सोडाच पण पत्रकारांचा देखील फोन घेत नाहीत.

त्यांच्याकडे वासुंदे ता.दौंड येथील खडी क्रेशर च्या वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत,परंतु त्यांनी कसलीही दखल घेतलेली नाही.उलट खडी क्रेशर मालकांना कारवाई न करता एक प्रकारे मदतच केली आहे.असे येथील ग्रामस्थ हनुमंत जांबले यांनी सांगितले आहे.पुणे जिल्ह्याच्या खनिकर्म शाखेत आंधळ जळतंय आणि कुत्र पिठ खातय अशी अवस्था झाली आहे.खडी क्रेशर मालकांनी कमी रॉयल्टी काढून अतिमोठ्या प्रमाणात उत्खनन केले आहे.आणि शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवून गौण खनिज ची चोरी केली आहे.आणि करोडो रुपयांना शासनाला चुना लावला आहे,तरीदेखील महसूल अधिकारी काही कारवाई करताना दिसत नाहीत.याचाच अर्थ हात ओला तर मैतर भला असाच होतो.अशी येथील ग्रामस्थांमध्ये जोरदार चर्चा आहे.पाहूयात अजून महसूल अधिकारी किती दिवस कारवाई करत नाहीत.आणि शासनाच्या मालमत्तेवर खडी क्रेशर मालक डल्ला मारून शासनाला किती दिवस चुना लावणार आहेत.आणि गौण खणिजचे अधिकारी बघ्याची भूमिका घेणार आहेत. असे पत्रकारांशी बोलताना हनुमंत जांबले यांनी सांगितले आहे.

# इंदापूरच्या वालचंदनगर येथे सापडले ९ बॉम्ब

## वालचंदनगर पोलिसांच्या सिंघम कामगिरीचे सर्वत्र होतेय कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**



चित्रपटात शोभतील असे बॉम्ब प्रत्यक्षात पुणे जिल्ह्यातल्या इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर पोलिसांनी दरोडेखोराकडून ताब्यात घेतले आहेत. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.या प्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं आहे.सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके,वय २३ वर्षे,राहणार कळंब ता. इंदापुर जिल्हा पुणे असं आरोपीचं नांव आहे.याबाबत आता वालचंदनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वालचंदनगर पोलिसांनी एक-दोन नव्हे तर तब्बल नऊ बॉम्ब,तिन पिस्टन आणि तलवारी कोयते घेऊन दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगाराला वेळीच सापळा रचून त्याच्या मुस्क्या आवळल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली आहे.वालचंदनगर पोलिसांनी ऐन गणपती आणि ईद-ए-मिलादच्या मुहूर्तावर केलेल्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

आरोपी सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके रा. कळंब याचा वालचंदनगर पोलीस शोध घेत होते.तो वालचंदनगर येथील अंजली बाल मंदीर क्रमांक ०१ येथील कामगार वसाहतीच्या पोस्ट कॉलनी डी - ३ मधील खोली क्रमांक ०३ मध्ये त्याच्या मित्रांसोबत असल्याची बातमी पोलिसांना मिळाली.त्यानुसार वालचंदनगर पोलिस ठाण्यातील पो.हवा स्वामी, पो.हवा काटकर,पो.हवा बनसोडे,पो.कॉं.चितकोटे, पो.कॉं.चोपणे,पो.कॉं.सोनावणे,म.पो.कॉं.कर्दिक यांच्या पथकाने बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड,वालचंदनगर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा.पो.निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी सापळा लावला आणि सदर आरोपीला ताब्यात घेतले.यात पोलिसांनी त्याच्याकडून ३ गावठी पिस्टल मॅग्झीन सहीत एक खाली मॅग्झीन,दहा जिवंत काडतुसे (राऊंड),चौदा वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल,दोन लोखंडी कटर,एक लोखंडी तलवार,दोन लोखंडी चाकु,एक मुठ नसलेले तलवारीचे पाते आणि ९ मोठे बॉम्ब असा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.त्यामुळे वालचंदनगर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ...आता बस झांल ४० वर्षांपासून आष्टी,पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे राजकारण प्रस्थापित आमदारांच्या घराभोवती फिरत आहे पर्याय हवा-प्रा.सुशिलाताई मोराळे

## आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभेची निवडणूक लढणार-प्रा.सुशिला मोराळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी मतदारसंघात ४० वर्षापासून आष्टी मतदार संघाचे राजकारण धोंडे,धस,दरेकर, आजबे या चार घराण्या भोवती फिरत आहे परंतु त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन नाही त्यांच्या भूलथापांना जनता त्रासली आहे.मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभा निवडणुक रिंगणात उतरुन खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या प्रवक्त्या प्रा. सुशिला मोराळे यांनी पत्रकार परिषदेत केले.गेल्या महिनाभरापासून विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सुशीला मोराळे यांनी जनसंवाद दौरा सुरु केला आहे. त्या अनुषंगाने रविवार दि.९ सप्टेंबर रोजी आष्टी तालुक्यात आले असता सायंकाळी ६ वाजता आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मोराळे बोलत होत्या. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, गेल्या ४५ वर्षात या मतदारसंघाने २० वर्ष भिमराव धोंडे,१५ वर्ष सुरेश धस व पाच-पाच वर्ष दरेकर आणि आजबे यांनी आमदारकी भोगली आहे.आमदारकीची माळ गळ्यात पडल्यानंतर ते विकासापासून कोसो



दूर आहे. आष्टी मतदारसंघ त्यांनी ओरबाडून खाल्ला आहे.या मतदारसंघांमध्ये एमआयडीसी उपलब्ध नाही मुख्य रस्त्यांची दुरवस्था आहे.त्यामुळे या चारही नेत्यांना मतदार संघातील जनता त्रासली आहे.मतदार संघात आमदारकीचा नवा पर्याय नव्हता.मी सुरुवातीपासून भारतीय जनता पार्टीच्या विरोधात असल्याने आमदारकीच्या रिंगणात अद्याप उतरले नाही परंतु शरदचंद्र पवार साहेब यांच्या पक्षाची विचारधारा मला मान्य असल्याने खा.शरद पवार यांच्या आदेशाने आष्टी मतदारसंघाची निवडणूक लढविणार असून विजयी होणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील अनेक गावांमध्ये त्यांच्या दौऱ्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे प्रा.मोराळे निवडणुकीसाठी सक्रिय झाल्याने आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघात चुरस निर्माण होणार आहे.

### राक्षसभूवनच्या राष्ट्रवादीला पुन्हा खिंडार

# अमरसिंह पंडितांना सोडून असंख्य कार्यकर्ते बदामराव पंडित यांच्या फौजेत दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुका जवळ येऊ लागताच गेवराई विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण बदलू लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ अमरसिंह पंडित यांना सोडचिठ्ठी देऊन राक्षसभुवन, परसराम तांडा आणि चव्हाणवाडी तांडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे राष्ट्रवादीला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडले आहे.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे सतत जनतेत राहून त्यांच्या अडीअडचणी सोडवत असल्याने गेवराई विधानसभा मतदारसंघातील सामान्य माणसाला ते जवळचे वाटतात. त्यातच गेवराई तालुक्यातील राजकारणात अनेक घडामोडी घडल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांनी शरद पवार यांना सोडून अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तालुक्यातील शरद पवार यांना मानणारा वर्ग या दोन्ही पंडित बंधूवर नाराज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अमरसिंह पंडित यांनी तालुक्यात शिवसेना फोडाफोडीचे काम सुरू करताच, बदामराव पंडित



यांनीही आता अजित पवार राष्ट्रवादीला हिसका दाखवायला सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्या राक्षसभूवन या गावातच राष्ट्रवादीला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडले आहे. राक्षसभूवन येथील राजेंद्र नाटकर, सोमनाथराव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते सुभाष पोटफोडे यांच्यासह रवी सुतार, शामराव कुऱ्हाडे, अर्जुन आहेर, संतोष आहेर, सुरज आहेर, शाहेद बागवान, सनी पोटफोडे, रोहन धुमाळ, आदित्य आहेर, परसराम तांडा येथील रामेश्वर राठोड, परमेश्वर राठोड, ज्ञानेश्वर राठोड, शमेश्वर राठोड, चव्हाणवाडी तांड्यावरील विष्णू चव्हाण, ताराचंद चव्हाण आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. बदामराव पंडित आणि युवानेते यशराज पंडित यांनी सर्वांच्या गळ्यात भगवे रुमाल घालून त्यांचे स्वागत केले. आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान देऊन राजकीय संधी दिली जाईल. कोणतेही काम असू द्या मला हक्काने सांगा पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील असा विश्वास यावेळी बदामराव पंडित यांनी व्यक्त केला आहे.

## पाणीपुरवठा विभाग अभियंताच्या खुर्चीला निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा-डॉ.गोपाल बछिरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

मेहकर पाणीपुरवठा विभाग अभियंताच्या खुर्चीला निवेदन देऊन जल जीवन मिशन कामाची माहिती द्या नसतात आंदोलनाचा इशारा शिवसेना उ.बा.ठा. जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी दिला.



मेहकर व लोणार तालुक्यातील जलजीवन मिशनच्या कामाविषयीची माहिती मागण्यासाठी उपविभागीय अभियंता श्री धाबे साहेब यांच्याकडे सहा तारखेला निवेदन देण्यास गेले असतात तेव्हाही ते उपस्थित नव्हते व आज सुद्धा ते कार्यालयात उपस्थित नव्हते त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता अर्ध्या तासात कार्यालयात पोहोचतो असे सांगितले दीड तास वाट पाहून सुद्धा धाबे साहेब कार्यालयात फिरकले नाही म्हणून माहिती मागणीचे निवेदन शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, शहर प्रमुख गजानन जाधव, शहर उपप्रमुख लुकमानभाई कुरेशी, युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, किसन आघव, गणेश पाठे यांनी उपविभागीय अभियंता श्री धाबे साहेब यांच्या खुर्चीला निवेदन निवेदन देऊन खालील माहिती मागितली आहे

१) जलजीवन मिशनच्या कामे पूर्ण करण्याचाअवधी काय होता व वेळेत कामे पूर्ण न होण्याची कारणे

२) लोणार मेहकर तालुक्यात जलजीवन मिशन चे काम किती प्रतिशत पूर्ण झाली व किती बाकी आहे याविषयीची सविस्तर माहिती देने.

३) सुरुवातीपासून जलजीवन मिशनचे काम कोण कोणत्या व्यक्तीस किती किती रकमेची दिली त्याविषयी सविस्तर माहिती देणे.

४) सुरुवातीपासून जलजीवन मिशनचे काम कोणत्या फर्म ला किती किती दिले त्याचे बजेट किती त्याविषयी सविस्तर माहिती देणे.

उपरोक्त माहिती तत्काळ देण्यात यावी अन्यथा पाणीपुरवठा विभागाच्या विरुद्धार्थी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी असा इशारा देण्यात आला.

## दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात श्री गणेशाची विधीवत स्थापना



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय दे.राजा जि. बुलढाणा येथे शनिवार दि.०७ सप्टेंबर २०२४ रोजी श्री. गणेशाची प्राचार्य श्री. सुरेशजी गारडे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून स्थापना करण्यात आली. यानिमित्ताने विद्यालयाच्या श्री.गणेश उत्सव समितीच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी पर्यावरण पुरक सजावट करून आकर्षक रोषणाई सुध्दा केलेली पहायला मिळाली.

या प्रसंगी शिप्रमंचे संचालक तथा विद्यालयाचे पालक संचालक श्री.बाबासाहेब मीनासे,स्थानिक सल्लागार श्री.छबुरावजी भावसार,महाराज म्हणुन श्री.सुधाकरराव कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षिका प्राध्यापक - प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होते. श्री.गणेश उत्सव समितीने दहा दिवसांचे आरतीचे आणि प्रसाद वितरणाचे नियोजन केले असून यानिमित्ताने विद्यालयात विविध स्पर्धांचेही आयोजन समितीच्या वतीने करण्यात आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन श्री. गणेश उत्सव समितीचे प्रमुख श्री.पी.बी.ठाकूर सर यांनी आपल्या इतर सहकार्यांच्या मदतीने केले.

## दीनदयाल विद्यालय, कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, दे राजा येथे शिक्षक दिन व स्वयंशासन उत्साहात साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दीनदयाल विद्यालय,देराजा येथे ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती म्हणजेच शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. हा दिवस स्वयंशासन self Governance Day सुद्धा साजरा केला जातो.

याप्रसंगी विद्यार्थी हे शालेय प्रशासन सांभाळत असतात. त्यामूळे त्या दिवशीचे प्राचार्य म्हणून अमर ढाकणे वर्ग १० वा, उपप्राचार्य कु. श्रृती काकड ह्या विद्यार्यांनी व विद्यालयाचे प्राचार्य श्री. सुरेशजी गारडे ह्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व माता सरस्वती पूजन केले.

स्वयंशासन मध्ये ८० विद्यार्थ्यांनी शिक्षक होवून वर्गात अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापक, शिक्षक वृंदाचे गुलाब पुष्प देवून सत्कार केला.

कार्यक्रमाचे, नियोजन,संचलन व आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी स्वतः केले.

कार्यक्रमासाठी, मा प्राचार्य श्री. सुरेशजी गारडे सर, कार्यक्रमाचे प्रमुख श्री.आर. सी पडुळकर सर, सहप्रमुख श्री आर एम डोईफोडे सर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.

## माजी मंत्री आमदार बबनरावजी पाचपुते यांचा वाढदिवस साधेपणाने व विविध उपक्रमाने साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

माजी मंत्री तथा श्रीगोंद्याचे विद्यमान आमदार श्री बबनराव पाचपुते यांचा ७० वा वाढदिवस साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला यावेळी विविध उपक्रम राबविण्यात आले होते यामध्ये आरोग्य तपासणी शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरामध्ये जवळ पास ५०० पेक्षा अधिक युवक व महिलांनी रक्तदान केले

आमदार बबनराव दादा पाचपुते साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री ना. मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब व उपमुख्यमंत्री ना.मा.श्री.अजित दादा पवार साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब या सर्वांनी दादांना फोन द्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच आमदार राहुल दादा कुल, आमदार मोनिकाताई राजळे, माजी आमदार सुधीरजी तांबे यांनी फोन द्वारे शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषदचे माजी सदस्य सचिन भाऊ जगताप भाजपा तालुकाध्यक्ष संदीप नागवडे पंचायत समितीचे माजी सभापती हरीदास शिर्के राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष सुदामराव नवले भरतनाना नवले यांसह अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. तसेच सोलापूरचे दादांचे निष्ठावंत कार्यकर्ते श्री.कुमार चेन्ना यांनी दादांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सोलापूर येथे गरिबांना अन्नदानाचा उपक्रम केला. दिवसभर हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटून दादांना शुभेच्छा दिल्या यावेळी

## विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून सर्रास लूट शेतकऱ्यांकडून घेतायत प्रती पीक २५० रुपये

### बदामराव पंडित यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**गेवराई । प्रतिनिधी**

गेल्या चार वर्षापासून गेवराई तालुक्यातील उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी पीक विमा भरलेला असतानाही त्यांना मदत मिळाली नाही. परंतु सध्या पीक पंचनामा करण्यासाठी आलेल्या पिक विमा अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांची सर्रासपणे लूट केली जात आहे. प्रती पिक २५० रुपये अशा पद्धतीने पंचनामेसाठी वसूल करणाऱ्या विमा कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यात गेल्या चार ते पाच वर्षापासून सतत ओला किंवा कोरडा दुष्काळ पडल्याने उभ्या पिकाचे अतोनात नुकसान झालेले आहे. यापासून संरक्षण मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक विमा ही भरलेला आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसान झालेल्या पिकाचा मोबदला मिळाला नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर पिक विमा कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी पंचनामा करण्यासाठी ग्रामीण भागात फिरत आहेत. रामपुरीसह पंचक्रोशीतील इतर गावांमध्ये पीक पंचनामा करताना प्रत्येक पिकासाठी २५० रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांकडून पिक विमा कंपनीचे अधिकारी व कर्मचारी वसुली करत आहेत. चार ते सहा पिकाचे पंचनामे करण्यासाठी शेतकऱ्यांना हजारो रुपयांचा भुर्दंड पुन्हा एकदा सहन करावा लागत आहे. अगोदरच दुष्काळ आणि त्यात पुन्हा १३ वा महिना, अशी स्थिती शेतकऱ्यांची झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे सध्या गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करत असताना, अनेक शेतकऱ्यांनी त्यांची भेट घेऊन याबाबतच्या तक्रारी व्यक्त केल्या. संतप्त झालेल्या माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी संबंधित पिक विमा कंपनीच्या अनेक अधिकारी, कर्मचाऱ्यांना फोन द्वारे शेतकऱ्यांकडून पैसे न घेण्याबाबत सूचना केल्या. जे कर्मचारी व अधिकारी शेतकऱ्यांची अशा पद्धतीने लूट करत असतील त्यांच्यावर तात्काळ कडक कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. वीमा कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कंपनीकडून याबाबत पेमेंट मिळत असताना, गोरगरीब शेतकऱ्यांची लूट का करता असा संतप्त सवालही त्यांनी व्यक्त केला. याप्रकरणी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेऊन तक्रार करणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी घेतायत संगणकाचे धडे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील २२७३ शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापित केल्या असून प्रत्येक शाळेवर या संगणक प्रयोग शाळेसाठी एक इन्स्ट्रक्टर सुद्धा रुजू करण्यात आलेले आहे,आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागेल व ते शिकावं पण लागेल हे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई,राज्य प्रकल्प संचालक श्रीमती आर विमला मॅडम यांनी आयसीटी (इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी)हा उपक्रम राबविण्याचे योजिले आहे.यामध्ये बीड जिल्ह्यातील १०१ शाळेमध्ये हा उपक्रम चालु असुन,अतिशय चांगल्या प्रकारचा उपक्रम राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई,श्रीमती. आर विमला मॅडम यांच्या सुचनेप्रमाणे व बीड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री.भगवान फुलारी सर (प्रा.) यांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे,तर येणाऱ्या काळात या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होणार आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904